Historicity Research Journal
ISSN : 2393-8900
Impact Factor : 0.4521 (UIF)
Volume - 3 | Issue - 2 | October - 2016

# भाळवणी येथील ऐतिहासिक स्मारक

डॉ. स्वराली चंद्रकांत कुलकर्णी
टिळक महाराष्ट्र विदयापीठ, पुणे.



## प्रस्तावना

पंढरपूर तालुक्यामध्ये भाळवणी हे एक लहानसे गाव असून याठिकाणी एक गढी आहे. ही गढी येथील वतनदार नाईक निंबाळकर यांची आहे. या नाईक निंबाळकरांचा इतिहास हा माळशिरस तालुक्याशी निगडीत असा आहे. इ.स. 1707 मध्ये मोगलांच्या कैदेतून सुटलेल्या शाहुछत्रपतींनी अक्कलकोट याठिकाणी फत्तेसिंह भोसले यांची अक्कलकोटचे जहागिरदार म्हणून नेमणूक केली. त्यांना जी जहागीर दिली त्यामधील परगण्यामध्ये अकलूज आणि भाळवणी हे परगणे होते. अक्कलकोटच्या फत्तेसिंह भोसलेंनी आपल्यातर्फे अकलूज व भाळवणी या परगण्यासाठी निंबाळकर या घराण्यास नेमले. मध्ययुगीन कालखंडामध्ये या निंबाळकर घराण्यास अकलूजचे नाईक निंबाळकर म्हणून ओळखण्यास सुरुवात झाली. या अक्कलकोटच्या निंबाळकरांचे वैवाहिक संबंध ग्वाल्हेरच्या शिंदे घराण्याशी होते. अकलूज येथील निंबाळकर घराण्यास जे हक्क व अधिकार अक्कलकोटच्या भोसल्यांनी दिले होते. त्याबाबतची सविस्तर माहिती मिळते. पेशवे काळामध्ये अमृतराव या वारसाकडे अकलूज व भाळवणी हे परगणे आले. हा अमृतराव निंबाळकर अकलूजचा देशमुख होता. या निंबाळकरांनी आपल्या वास्तव्यासाठी भाळवणी येथे एक गढी बांधलेली होती. या गढीचे प्रत्यक्ष क्षेत्र सर्वेक्षण करताना येथे असणाऱ्या वारसदारांनी निंबाळकर घराण्याची वंशावळ आणि त्यांना मिळालेल्या हक्कांची सनद दिलेली आहे. त्यानुसार हे घराणे प्राचीन काळाशी नाते सांगणारे आहे हे लक्षात येते. या निंबाळकरांचा प्राचीन वंश हा इ.स. 1244 पासुन धार याठिकाणी परमार या नावाने वास्तव्यास होते. निंबाळकर परमार यांनी घराण्याची वंशावळ आणि त्यांना मिळालेल्या हक्काची सनद दिलेली आहे. त्यानुसार हे घराणे प्राचीण काळाशी नाते सांगणारे आहे हे लक्षात येते. या निंबाळकरांचा प्राचीन वंश हा इ.स. 1244 पासून धार याठिकाणी परमार या नावाने वास्तव्यास होते. निंबराज परमार हे या घराण्याच्या मुळ पुरुषाचे नाव होय. या परमारांचाच वंश माळव्यातून इस्लामी आक्रमणाच्या लाटेत महारष्ट्रामध्ये आला. आणि महारष्ट्रात निंबळक या ठिकाणी राहू लागले. म्हणूनच परमार हे मुळचे नाव जाऊन निंबाळकर असे नाव पडले. याबाबतची माहिती अनेक ऐतिहासिक साधनग्रंथामध्ये मिळाल्याचेही या निंबाळकरांनी म्हटलेले आहे. त्यामध्ये ऐतिहासिक संकीर्णसाहित्य, निंबाळकरघराण्याची कैफियत आणि इतिहास संशोधक अंक या ग्रंथाचा समावेश होतो. महारष्ट्रात आलेल्या या निंबाळकरांच्या अनेक शाखा निर्माण झाल्या. उदा. फलटणचे निंबाळकर, वाठारचे निंबाळकर, परांडा, करमाळा, येथील रावरंभा निंबाळकर शाखा आणि भाळवणी निंबाळकर शाखा इ. त्यापैकी भाळवणी निंबाळकर शाखा ही अकलुजशी संबंधीत असलेल्या निंबाळकरांची शाखा होय. या भाळवणी शाखेचा मुळपुरुष सिद्धोजी निंबाळकर हा शिवछत्रपतींच्या सैन्यात सरलष्कर होता. व तोच भाळवणी शाखेचा मुल्य पुरुष होता. याच निंबाळकर घराण्यातील खंडेराव नाईक निंबाळकर यांनी पानिपतच्या तिसऱ्या लढाईत चांगला पराकम गाजवला होता. त्यामुळे या निंबाळकर घराण्यास भाळवणी व आसपासचा प्रदेश जहागिर म्हणून पेशव्यांनी दिलेला होता. याबाबतचे मराठीतील एक पत्र प्रत्यक्षसर्वेक्षणाच्यावेळी भाळवणीच्या गढीतील वारसदारांनी दिले आहे, ते प्रबंधाच्या परिशिष्टात जोडलेले आहे. छत्रपती रामराजाची बहीण दर्याबाई ही या घराण्यात दिलेली होती. थोडक्यात मध्ययुगीन कालखंडात इतिहासात प्रसिद्ध असणारे हे भाळवणीच्या निंबाळकरांचे घराणे होय. या निंबाळकरांची गढी आजही चांगल्या स्थितीत भाळवणी येथे आहे. अकलूजमध्ये या निंबाळकरांना अकलूजमध्ये कोणकोणते हक्क वसुल करण्याचा अधिकार होता, त्याबाबतचा उल्लेखही मिळतो. इ.स. 1826 मध्ये या निंबाळकरांना असलेल्या हक्काची यादी संबंधीत ग्रंथात वाचण्यास मिळते.

निंबाळकरांची ही गढी उत्कृष्ट तटबंदीची असून याला एक भले मोठे प्रवेशद्वार आहे. आजही संपूर्ण तटबंदी आतमधील पाण्याची विहीर आणि गढीत राहण्यासाठी असणारी घरे अस्तित्वात आहेत. या भाळवणीच्या गढीमध्ये हिरे–माणकांचा बाजार भरत असे. अशा दंतकथा नागरिकांकडून ऐकण्यास मिळतात. ऐतिहासिक स्मारक म्हणून या गढीचे व या वतदनदारांचे महत्व आजही गावकऱ्यांना वाटते.

## भाळवणी येथील शाकचंबरी मंदिर–

भाळवणी या गावी शाकंबरीचे जुने मंदिर आहे. या मंदिराचे प्रवेशद्वार उत्तरेला असून या प्रवेशद्वाराच्या पायाचे बांधकाम दगडी तर वरील बांधकाम विटांचे आहे. प्रवेशद्वाराच्या आत दोन्ही बाजूस चौकी पहाऱ्यासाठी दगडी ओवऱ्या आहेत. मंदिराच्या प्रवेशद्वारावर गणपती, गरुड अशी विविध शिल्पे विशंमध्ये दोन्ही बाजूस बसविलेली आहेत. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस हत्तीचे खंडीत भव्य शिल्प आहे. मंदिराच्या प्रांगणात प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दीपमाळ आहेत. या दीपमाळा मंदिराइतक्याच जुन्या आहेत. प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूस दगडी चौकोनी चौथाऱ्यावर अतिशय सुंदर व भक्कम स्थितीत असलेली दीपमाळ आहे. दिपमाळेच्या दगडी चौथाऱ्याला चारही बाजूनी दगडी हत्तीचे मोठे शिल्पे बांधकामात बसविलेली दिसतात. याशिवाय या दगडी चौथाऱ्यालाच पानाफुलांनी दगडी शिल्पे, महादेवास नागाने वेढलेली शिल्प, हत्तीने मोर तोंडात धरलेले शिल्पे, व एक व्याघ्रशिल्प आहे. चौथाऱ्यावर दिपमाळेच्या सुरुवातीला कमळाकृती 9 हत्तीचे शिल्पे असून त्यावर मोत्याच्या माळेप्रमाणे दगडी ओळ आहे व त्यानंतर दिपमाळेचे सुरु होते या दिपमाळेच्या बाजूस जाते, काही खंडीत प्राण्यांची शिल्पे इतस्ततः विखुरलेली दिसतात. उजव्या बाजूस असणारी दिपमाळ 200 वर्षापूर्वीची आहे. श्री. तोडकरी यांनीही दीपमाळ बांधल्याचा उल्लेख देवांगकोष्टी पुराणमध्ये मिळतो.

मंदिराचे मोकळे प्रांगण ओलांडले की, शाकंबरीचे मंदिर सुरु होते. हे मंदिर पूर्ण दगडी असून ते एका उंच चौथाऱ्यावर आहे. या मंदिराचे अंतराळ सभामंडप व गर्भगृह असे भाग आहेत. अंतराळ हे चार दगडी खांबावर उभे आहे. या दगडी खांबावर विविध शिल्पे आहेत. यानंतर सभामंडप लागतो. हा सभामंडप 16 दगडी खांबावर उभारलेला आहे. दुसऱ्या ओळीतील दुसऱ्या खांबावर गरुडाचे शिल्प आहे म्हणून त्यास गरुडखांब असे म्हणतात. सभागृहाचे बांधकाम दगडी तसेच त्याचे छत दगडी चिऱ्यावर चिरे देवून केले आहे.

यानंतर असणारे गर्भगृहाचे प्रवेशद्वार कर्नाटक शैलीसारखे वाटते. या दगडी प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दोन देवींची शिल्पे आहेत. या प्रवेशद्वाराच्या खालील बाजूस दोन राक्षसमुख व बरोबर मध्ये डमरू आहे. प्रवेशद्वाराच्यावर दक्षिणात्य शैलीचे तीन गोपुरे आहेत. गर्भगृहास 0.85 मीटर रुंद व 1.70 मीटर लांब लाकडी दरवाजे आहेत. यानंतर गर्भगृहात उत्तरेकडे तोंड करुन असलेली बनशकंरी देवीची मूर्ती आहे. ही मूर्ती चर्तुभुज असून एका हातात डमरु, एका हातात त्रिशुल, एका हातात डमरु तर एका हातात खोबऱ्याची वाटी आहे. देवीस विविध प्रकारचे अलंकार मूर्तीतच कोरलेले आहेत.

याशिवाय भाळवणी येथे नाईक निंबाळकर यांचा वाडा आहे. या वाडयाचे क्षेत्रफळ 26.75 चौ.मी. आहे. या वाडयास लाकडी खिळयाचे भक्कम असे प्रवेशद्वार आहे.

भाळवणी येथे अशी ऐतिहासिक स्मारके आहेत ती पुढे आणणे ही पेपरचा प्रमुख उददेश आहे.

### *संदर्भ साधने –*


1.राणा पंढरीचा, डॉ. गोपाळ बेणारे, श्री संत वाङमय सेवा प्रकाशन पंढरपुर–1983
2.सोलापूर डिस्ट्रक्ट गॅझिटीयर, 1886.
3.भारतीय संस्कृती कोश खंड–5, पंडीत महादेव शास्त्री जोशी.
4.सोलापूर जिल्हयाची बखर, गोपाळ देशमुख, रेयु प्रकाशन, पुणे, 1981.
5.प्रत्यक्ष सर्वेक्षण.
6.भागवताचार्य श्री. वा.ना. उत्पात यांच्या मुलाखतीत.






प्लेट क्र. २०. - शाकंबरीदेवी मंदिरासमोरील दिपमाळ- भाळवणी



